ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ७ फेब्रुवारी, १९५१ अंक ६

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)
श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,१८,२८५ |

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

भोर स्टेट बँक लि.
[स्थापना : १९३४]
मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.
शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. बु. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी.
श्री. वा. ग. चंदुके.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी
पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.) मॅनेजर.

दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**७८ फूट लांबीचें प्रचंड रेल्वे एंजिन**—ब्रिटनमध्यें येत्या मे महिन्यांत भरणाऱ्या औद्योगिक प्रदर्शनांत ७८ फूट लांबीचें एक प्रचंड रेल्वे एंजिन ठेवण्यांत येणार आहे. ह्या एंजिनाचें वजन १३० टन आहे. त्याच्या कोळशाच्या डब्यांत १८ टन कोळसा मावतो आणि तें ५,००० गॅलन पाण्याचा सांठा करूं शकतें. हें एंजिन भारतासाठी तयार करण्यांत आलेलें आहे. नॉर्थ ब्रिटिश लोकोमोटिव्ह कंपनीनें तें ग्लासगो येथील आपल्या कारखान्यांत बांधलें.

**कारखानदारांची जंत्री**—ऑल इंडिआ मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन ह्या संस्थेतर्फे भारतांतील कारखानदारांची माहिती देणारी एक डायरेक्टरी लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. ह्या पुस्तकांत सुमारें २०,००० कारखानदारांची तपशीलवार माहिती देण्यांत येणार आहे. कारखाना तयार करीत असलेला माल, त्याची उत्पादनक्षमता व भांडवल ही माहिती देण्यांत येईल. ह्या डायरेक्टरीसाठीं ७५,००० रुपये खर्च येणार आहे. जून, १९५१ मध्यें ती प्रसिद्ध होईल.

**ब्रिटनचें अणुशक्ति केंद्र**—सेलाफील्ड येथें ब्रिटननें एक नवें अणुशक्ति केंद्र बांधलें आहे. तें बांधण्यास २,२४,००,००० पौंड खर्च आला. ॲटम बॉम्बमध्यें वापरण्यांत येणारें प्ल्यूटोनिअम नांवाचें स्फोटक ह्या केंद्रांत तयार होईल. ह्या स्फोटकाचा उपयोग औद्योगिक कार्यासाठीही करतां येतो. अणुकेंद्र नुकतेंच चालू करण्यांत आलें.

**न्यूयॉर्कमध्यें मनूचा पुतळा**—मनुस्मृतीचा कर्ता मनु कोणता, ह्याबद्दल भारतांत बराच वाद असला तरी मनूचा एक पुतळा न्यूयॉर्क स्टेटच्या अपेलेट कोर्टाच्या इमारतीवर बसाविण्यांत आला आहे. एक थोर कायदे करणारा म्हणून मनूला हा मान देण्यांत आला आहे. मनूबरोबरच कान्फ्यूशिअस सारख्या चिनी स्मृतिकाराचाही पुतळा बसाविण्यांत आला आहे.

**स्वातंत्र्य संग्रामाचें प्रदर्शन**—भारतांतील लोकांचें जीवन आणि त्यांनीं ब्रिटिशांविरुद्ध केलेला संग्राम ह्यासंबंधींचीं पुस्तकें व इतर माहिती दिल्लीमधील चिनी वकिलातीनें कलकत्ता विद्यापीठाकडे मागितली आहे. ह्या साहित्याचा उपयोग करून पेकिंग येथें भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचें एक प्रदर्शन भरविण्याचा चिनी सरकारचा मानस आहे. अशा प्रदर्शनामुळें भारत आणि चीन ह्यांचे सांस्कृतिक संबंध दृढ होतील, असें चीनच्या सरकारचें मत आहे.

### शेतीस कर्ज–पुरवठा : रिझर्व्ह बँकेचें स्थान
### सहकारी बँकांचीहि तपासणी होऊं लागणार ?

रिझर्व्ह बँक शेतीस अधिक कर्ज पुरवठा कसा करूं शकेल ह्याबाबत चर्चा करण्यासाठी तज्ज्ञांची एक लहानशी अनौपचारिक परिषद मुंबई येथें गेल्या आठवड्यांत भरली होती. प्रो. ध. रा. गाडगीळ, अध्यक्षस्थानीं होते. प्रा. द. गो. कर्वे, श्री. वा. पुं. वर्दे, श्री. आर. जी. सरय्या, सर मणिलाल नानावटी इत्यादि तज्ज्ञ उपस्थित होते. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर बी. रामराव व डेप्युटि गव्हर्नर श्री. मेहेकी ह्यांनीं चर्चेत भाग घेतला. जीं राज्यें थोडीशीं मागासलेलीं आहेत, अशांनाहि रि. बँकेनें कर्ज पुरवठा करण्याचें अगत्य परिषदेनें मान्य केलें. १२ महिन्यापर्यंतच्या मुदतीपर्यंतच्या शेती व्यवसायास कर्ज पुरविण्यास आणि लँड मॉर्टगेज बँकांचीं डिबेंचर्स ह्यापूर्वीपेक्षां अधिक प्रमाणांत घेण्यास रिझर्व्ह बँकेनें दिलेल्या संमतीबद्दल परिषदेनें संतोष व्यक्त केला. मध्यम मुदतीच्या कार्यासाठीहि रिझर्व्ह बँकेनें कर्जपुरवठा करावा, असें सुचविण्यांत आलें. रिझर्व्ह बँक सहकारी बँकांना जास्त सढळपणें कर्जे देणार हें लक्षांत घेतां, रिझर्व्ह बँकेला सहकारी बँकांच्या तपासणीचा अधिकार कायद्यानें देण्यांत यावा असें मत व्यक्त झालें. तज्ज्ञांची एक सल्लागार समितीहि दैनंदिन सल्ल्यासाठी नेमावी असें उपस्थित तज्ज्ञांनीं सुचविलें.

(रिझर्व्ह बँकेच्या ॲ. क्रे. सहकायान)

### औद्योगिक कारखानदारांना प्राप्तीकरांत सूट

भारतांत ३१ मार्च, १९५१ पूर्वी उत्पादनास सुरुवात करणाऱ्या नव्या औद्योगिक कारखान्यांना त्यांत गुंतविलेल्या भांडवलाच्या दरसाल ६ टक्के इतक्यापर्यंतच्या नफ्यावरील प्राप्तीकराची सूट ५ वर्षेंपर्यंत देण्याचें ठरविलें असल्याचें भारत सरकारनें २८ ऑक्टोबर १९४८ ला जाहीर केलें होतें. १९५३-५४ सालापर्यंतच्या आणि त्या वर्षाच्या उत्पन्नावर ही सूट देण्याची तरतूद करून वरील घोषणेची अंमलबजावणी करण्यांत आली होती. ज्या कालावधींत कारखान्यांना प्राप्तीकरांत सूट मिळणार आहे तो कालावधी लौकरच संपणार असल्यामुळें भारत सरकारनें ३१ मार्च, १९५१ नंतर उत्पादनास प्रारंभ करणाऱ्या कारखान्यांचे बाबतींतही अनुकूल विचार करण्याचें ठरविलें आहे. उत्पादनास प्रारंभ करण्याचे कामीं झालेली दिरंगाई अपरिहार्य असेल तर त्याला सवलत मिळेल.

### पंजाब नॅशनल बँक लि.

वरील बँकेस १९५० सालीं ३४ लक्ष, ६० रु. हजार नफा झाला. बोनससाठी ८,०२,१५६ रु., गुंतवणुकींतील घसाऱ्याची तरतूद १६,२८,२६६ रु., पाकिस्तानांतील कांहीं मालमत्तेची किंमत लिहून टाकण्यासाठी ४,८५,६६८ रु., पाकिस्तानांतील नष्ट पावलेली मालमत्ता ५०,३०३ रु., धर्मादाय ३६,८७० रु. असा नफ्याचा डायरेक्टरांनीं विनियोग करून ४,८६,७४५ रु. भागीदारांसाठीं उपलब्ध आहेत.

### रिझर्व्ह बँकांच्या गव्हर्नरांची परिषद

ब्रिटिश कॉमनवेल्थमधील वेगवेगळ्या राष्ट्रांच्या रिझर्व्ह बँकांचे गव्हर्नर सिडने येथें लवकरच एकत्र जमून विचारविनिमय करणार आहेत. ऑस्ट्रेलियाच्या संघराज्याच्या ५० व्या वाढदिवसाच्या निमित्तानें घडवून आणलेल्या परिषदांपैकींच ही एक परिषद आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ७ फेब्रुवारी, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अमेरिका, ब्रिटन व महायुद्धाची शक्यता

जागतिक परिस्थितीकडे तुलनात्मक दृष्टीने पाहिलें असतां असें दिसून येईल कीं उत्पादन व कार्यक्षमता यांच्या जोरावर अमेरिकेने १९५० अखेर प्रचंड सामर्थ्य कमाविलें आहे व या सामर्थ्याचा बराचसा भाग टिकाऊ स्वरूपाचा असल्यामुळें आज अमेरिका–कोरियांतील प्रसंगावरून जागतिक युद्ध निर्माण झाल्यास त्याला तोंड द्यावयास ती समर्थ बनली आहे. अमेरिकेच्या १९५० च्या उत्पादनाचे पुढील बोलके आंकडे विचार करण्यासारखे आहेत. सर्व प्रकारच्या मोटारींचें उत्पादन ८० लक्ष झालें. हें उत्पादन जगाच्या इतर देशांतील मोटारींच्या उत्पादनाच्या पांचपट असून एका वर्षांत मोटारींची निर्मिति १५ लक्षांनीं वाढली. १९५० सालीं १३ लक्ष, ६० हजार घरें बांधलीं गेलीं. पोलाद कंपन्यांनीं ९ कोटी टन पोलादाची निर्मिति केली. इतर सर्व देशांच्या पोलादाच्या उत्पादनाच्या दोन पट अमेरिकेचें उत्पादन आहे; व हें उत्पादन दुसऱ्या महायुद्धाच्या एका वर्षांतील सर्वांत जास्त उत्पादनाच्यापेक्षां एक कोटी टन जास्त आहे. कामावर असणारांची संख्या ६ कोटी, २२ लक्षांहून थोडी जास्त आहे व एक वर्षांतच ही संख्या ७॥ लाखांनीं वाढली. प्रत्येक काम करणाऱ्या व्यक्तीची उत्पादनशक्तिहि बरीच वाढली. अमेरिकेचें एकंदर राष्ट्रीय उत्पन्न एका वर्षांत २४·४ महापद्म डॉलर्सनें वाढून त्यानें २८० महापद्म डॉलर्सचा १९५० मध्यें उच्चांक गांठला. १९४९ च्या मानानें निरनिराळ्या धंद्यांतील नफ्यांत १९५० सालीं २७ टक्के वाढ झाली. सुमारें ८॥ महापद्म डॉलर्स रकम डिव्हिडंडच्या रूपानें शेअर होल्डर्सना दिली गेली. १९५० मध्यें १८ महापद्म डॉलर्स एवढी रकम नवीन भांडवलाच्या रूपानें गुंतविली गेली. सुप्रसिद्ध 'टाइम' या पत्रानें अमेरिकेबद्दल हे अगदीं ताजे आकडे नुकतेच दिले आहेत. या आंकड्यावरून, युद्ध–प्रयत्नांसाठीं योग्य ती तरतूद उत्पादनाच्या दृष्टीनें करावयास अमेरिकेनें सुरवात केली आहे हें स्पष्ट होतें.

वरील माहिती लक्षांत घेऊन प्रेसिडेंट ट्रूमन यांनीं सादर केलेलें नवीन अंदाजपत्रक पाहिलें म्हणजे अमेरिकेच्या युद्ध प्रयत्नांच्या तयारीची पूर्ण जाणीव होते. कारण, जुलै १९५१ ते जून १९५२ च्या अंदाजपत्रकांत खर्चाच्या बाबतींत १९५०–५१ च्या मानाने ७८ टक्के वाढ झाली आहे. पुढील वर्षाचें अंदाजपत्रक ७१५९४ दश लक्ष डॉलर्सचें असून त्यापैकीं ४१४२१ दश लक्ष डॉलर्स लष्कर व तत्संबंधीं गोष्टी यांजवर खर्चीं पडणार आहेत व ७११२ दक्षलक्ष डॉलर्स रकम अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांच्या संरक्षणासाठीं खर्चीं पडतील. सुमारें एक–दीड वर्षापर्वी अमेरिकेंत मंदीचीं लक्षणें दिसत होतीं, परंतु ती परिस्थिति बदलून ऐन दुसऱ्या महायुद्धाच्या काळापेक्षां एका वर्षांतच अमेरिकेने हर तऱ्हेचें उत्पादन वाढविलें व भावी महायुद्धाच्या दृष्टीने आपल्या अर्थव्यवहाराचीं चक्रें फिरवावयास सुरवात केली ही गोष्ट त्या देशाच्या आर्थिक सामर्थ्याची साक्ष परिणामकारकपणाने पटविते. शेतीचें उत्पादनहि २५ टक्क्यांनी वाढलें व उद्योगधंद्यांत नवीन भांडवल मोठ्या प्रमाणांत गुंतविलें गेलें याहि गोष्टी विशेष आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरपासून सुधारलेल्या आर्थिक परिस्थितीमुळें अमेरिकेला वरील प्रकारची उत्पादनक्षमता साध्य करतां आली. कोरियन लढ्याच्या सुरवातीपासून या उत्पादनक्षमतेंत आणखी भर पडली. ही परिस्थिति साध्य करण्यासाठीं महागाई व चलनविस्तार यांवर उपाय अमेरिकन सरकारला योजावे लागले. देशाच्या विशिष्ट ऐतिहासिक व भौगोलिक परिस्थितीमुळें भांडवलदार विरुद्ध मजूर हा लढा अमेरिकेंत नाहीं व त्यामुळेंहि उत्पादनवाढ करणें अमेरिकेला सोपें जातें.

ब्रिटनच्या परिस्थितीकडे लक्ष देतां असें दिसतें कीं, दुसरें महायुद्ध संपल्यानंतरच्या ५–५॥ वर्षांत ब्रिटननें आर्थिक परिस्थिति व उत्पादनक्षमता चिकाटीच्या प्रयत्नांनीं सुधारली असली तरी पुढील वर्षांची आर्थिक परिस्थिति ही मुख्यत: ब्रिटनला मिळूं शकणारा कच्चा माल व अन्नधान्य, फळें, भाजीपाला, लोणी इ. माल यांच्यावर व ब्रिटन करूं शकणाऱ्या निर्गतिवर बरीच अवलंबून आहे. आर्थिक परिस्थितीला ब्रिटिश लोकहि चिकाटीनें तोंड देऊं शकतात हें त्यांनीं गेल्या पांच वर्षांत स्पष्टपणें दाखविलें आहे. परंतु ब्रिटन इतर देशांच्या परिस्थितीवर जास्त प्रमाणांत अवलंबून आहे व त्याच्याच जोडीला ब्रिटननें स्वीकारलेलें आर्थिक धोरण कांहींसें समाजसत्तावादाकडे, निदान मजूर व सामान्य जनता यांच्या कल्याणाकडे, नि:संशय झुकणारें आहे व त्याचाहि परिणाम ब्रिटनच्या अर्थ व्यवहारावर होतो. ब्रिटनला आज आपलें स्थान टिकवून धरण्यासाठीं राष्ट्रकुटुंबांतल्या सदस्य राष्ट्रांची गरज आहे, त्याचप्रमाणें युरोपांतील कांहीं देशांचीहि गरज आहे. भावी महायुद्धाच्या प्रश्नाकडे ब्रिटननें याच दृष्टिकोनांतून पाहाणें साहजिकच आहे.

आधुनिक युद्धें तरी आर्थिक कारणांमुळेंच उद्भवतात असें मानावयास हरकत नाहीं. रशियाची व चीनची आर्थिक परिस्थिति कशी आहे हें समजण्यास निश्चित मार्ग नाहीं. परंतु रशियाची तयारी बरीच झाली असणें शक्य आहे व तेथील विशिष्ट राज्यपद्धतीमुळें गाजावाजा न करतां अशी तयारी करणें शक्य होतें. युरोपांतील इतर राष्ट्रें आर्थिक दृष्ट्या आज तरी युद्ध करण्याच्या परिस्थितींत आहेत असें वाटत नाहीं. हिंद, पाकिस्तान, अरब गट व आग्नेय आशियांतील राष्ट्रें आर्थिक परिस्थितीमुळें पोखरलेलीं आहेत. जपान व जर्मनी यांच्या लष्करीकरणाचा व आर्थिक पुनरुज्जीवनाचा प्रश्न या कमकुवत परिस्थितीमुळेंच आज महत्त्वाचा बनला आहे. आफ्रिका व दक्षिण अमेरिका यांची परिस्थिति जागतिक प्रश्नांना वळण लावूं शकत नाहीं. आर्थिक दृष्ट्या युद्धाला आजचें जग तयार आहे असें दिसत नाहीं, परंतु अमेरिका व रशिया यांची परिस्थिति मात्र या प्रश्नाला वळण लावूं शकेल.

## मुंबई प्रांतिक औद्योगिक सहकारी संघ

### १९४९-५० सालचें कार्य

मुंबई प्रांतिक औद्योगिक सहकारी संघाच्या १९४९-५० सालच्या अहवालावरून संघानें त्या वर्षांत केलेल्या कार्याची चांगली कल्पना येते. अहवालाच्या वर्षांत संघाच्या भागीदारांची संख्या २९६ वरून ४४० वर गेली व जमा झालेलें भांडवल रु. ११,००० नें वाढून तें २,२३,००० पर्यंत गेलें. नव्या भागीदारांत ९१ सहकारी सोसायट्या असल्यामुळें त्यांचे एकूण भागीदारांशीं प्रमाण आतां ६० टक्केपर्यंत चढलें आहे. औद्योगिक सहकारी चळवळीच्या भवितव्याच्या दृष्टीनें ही गोष्ट स्वागतार्ह समजली जाईल यांत शंका नाहीं. कारण, त्यांत सहकारी सोसायट्या व प्रांतिक संघ यांचा परस्परांबद्दलचा विश्वास प्रतीत होतो.

पूर्वीच्या वर्षाप्रमाणें, अहवालाच्या सालीं संघानें प्रादेशिक वितारक ( distributors ) नि जिल्ह्यांतील घाऊक विक्रेते ह्या नात्यानें सूत वाटपाचें काम सरकारतर्फे केलें. हें काम करतांना एक महत्त्वाचा नि इष्ट फरक करण्यांत आला. तो म्हणजे येईल नि वाटेल तसें सूत न घेतां जिल्ह्यांतून आलेल्या मागणी ( indent) च्या अनुरोधानें सुताचे साठे खरीदण्यास संघानें सुरुवात केली. पण अहवालाच्या वर्षीं सुताचा पुरवठा मागणीच्या मानानें अत्यंत अपुरा पडल्यामुळें संघाचा नाइलाज झाला. जून, १९४९ अखेरच्या ९॥ महिन्यांत संघानें ४॥ कोटी रुपयांचें सूत उचललें होतें; पण अहवालाच्या संबंध वर्षांत त्याला फक्त ८७ लक्ष रुपयांचें सूत मिळूं शकलें! नियंत्रित अर्थ-व्यवस्थेंत सूत-वाटप हा कमी धोक्याचा व किफायतशीर व्यवहार असल्यामुळें, प्रांतिक संघाला त्यांत ५ लक्ष रुपयांवर फायदा झाल्याचें दिसतें.

अहवालाच्या वर्षीं संघाच्या नेतृत्वाखालीं जंगल कामगारांच्या चार सहकारी मजूर सोसायट्या कार्य करीत होत्या. त्यांनीं तयार केलेला माल ( कोळसा नि इमारतीचें लाकूड ) विकण्याकामीं संघानें त्यांना मदत केली. संघाच्या पुणें नि नाशीक शाखांनीं ह्यांत बराच मोठा वाटा उचलला. प्रांतिक संघानें कातडी कमावणाऱ्यां-च्या व चामड्याचा पक्का माल तयार करणाऱ्यांच्या अशा एकूण पांच सोसायट्यांना त्यांचा धंदा वाढविण्याच्या दृष्टीनें मदत केली पण त्याचें दृश्य फळ अपेक्षेप्रमाणें मिळालें नाहीं असें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. राजपुताना खालमेशीं सोसायटीसाठी संघानें वांद्रा येथें कातडी कमावण्याचा कारखाना काढून दिला पण त्यांत काम करण्याकरतां सभासद पुढें आले नाहींत, ह्या अहवालांतील नोंदींचा येथें निर्देश करावासा वाटतो.

सोसायट्यांसाठी कच्चा माल विकत घेणें व त्यांचा पक्का माल विकणें हा संघाचा एक महत्त्वाचा उद्देश आहे. त्याप्रमाणें रु. २,५७,००० किंमतीचा माल विकणें संघाला अहवालाच्या सालीं शक्य झालें; पण ह्याबाबतचा एकूण अनुभव तितका आशादायक नसल्याचें नमूद करण्यांत आलें आहे. वस्तुस्थिति तशी असल्यास प्रांतिक औद्योगिक संघानें तिचा जास्त खोलवर विचार करणें अगत्याचें आहे. घटक सोसायटी-भागीदारांना प्रांतिक संघाबद्दल जास्त आपुलकी कशी वाटेल ह्याचा संघानें अवश्य शोध घ्यावा. खरेदी काय किंवा विक्री काय, त्याबाबच्या व्यवहारांत प्रांतिक संघाला मिळणारा फायदा ज्या त्या घटक-सोसायटी-सभासदांना थोड्याफार प्रमाणांत प्रत्यक्ष मिळूं लागल्यास सध्यांची स्थिति बदलेल असें वाटतें. प्रांतिक संघ सध्यां सूट ( Rebate ) देतोच. त्याच दिशेनें अधिक प्रलोभन दिलें गेल्यास घटक-सोसायट्या प्रांतिक संघाला चिकटून राहण्याचा जास्त संभव वाटतो. तात्कालिक व्यापारी फायद्यापेक्षां सहकारी औद्योगिक चळवळीच्या अंतिम हिताच्या दृष्टीनें प्रांतिक संघानें वरील सूचनेचा अवश्य विचार करावा.

मुंबई येथील ग्रामोद्योगांच्या मालाचें दुकान ("Sales Depot") चालविण्याकरतां प्रांतिक संघाला अहवालाचे मुदतींत २६,५०० रु. वर तोटा सोसावा लागला. जिल्ह्यांतहि तशाच तऱ्हेचीं दुकानें चालविण्याची संघाची योजना सरकारकडे विचारासाठीं पडून आहे. ही योजना मान्य होत असतांना दुकानांवर होणाऱ्या नुकसानीच्या कारणांची खोलवर चौकशी होऊन तीं नाहींशीं करण्याचा प्रयत्न प्रांतिक संघाकडून सत्वर करण्यांत येईल यांत शंका नाहीं. संघाच्या सर्व प्रकारच्या व्यवहारानंतर संघाजवळ निव्वळ नफा १,५०,००० रु. राहिला. राखीव फंड, खास फंड, रिबेट फंड अशा निरनिराळ्या फंडांत त्याची योग्य रीतीनें वाटणी करण्यांत आली असून भागीदारांना ४ टक्के दरानें डिव्हिडंड देण्याची तरतूद केलेली आहे.

प्रांतिक औद्योगिक संघाच्या कार्याचें मूल्यमापन त्यानें एका वर्षांत केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणावरून किंवा चालविलेल्या कामाच्या तात्कालिक आर्थिक यशावरून करणें योग्य होणार नाहीं. संघानें अंगिकारलेलें धोरण औद्योगिक सहकारी चळवळीस बळकटी आणण्याच्या दृष्टीनें योग्य नि पुरेसें आहे किंवा नाहीं ही त्याची खरी कसोटी समजावी लागेल. त्या दृष्टीनें, प्रांतिक संघाच्या कार्याची दिशा सर्वसाधारणपणें योग्यच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रतिकूल परिस्थितींत प्रांतिक संघाचा कारभार योग्य दिशेनें व व्यवस्थित चालविल्याबद्दल संघाचें कार्यकारी मंडळ नि. विशेषतः बिनावेतन काम करणारे कार्यवाह श्री. एल. एन. रेणु हे अभिनंदनास पात्र आहेत. पुढील वर्षांत प्रांतिक संघाला ह्यापेक्षां जास्त भरीव कार्य करतां येण्याइतकी सभोवतालची परिस्थिति अनुकूल होईल, असा विश्वास वाटतो.

---

**रशियाच्या राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ**— रशियाचें राष्ट्रीय उत्पन्न १९४० च्या मानानें २१ टक्के वाढलें असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. युद्धोत्तर काळांतील पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस १९४५ पासून प्रारंभ झाला. तो आतां पूर्ण झाला असल्यानें राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ झाली आहे.

**प. बंगालची लोकसंख्या**— पं. बंगालची लोकसंख्या अजमावण्यासाठीं घरोघरीं हिंडून माहिती गोळा करण्यांत आली. ह्या गणतींत नव्यानें आलेल्या निर्वासितांना वगळण्यांत आलें आहे. गणती करण्यासाठीं ५०,००० गणतीदारांना नेमावें लागलें. त्यांनीं प. बंगालमधील ३६,००० खेड्यांतून व शहरांतून हिंडून मोजणी केली. १९४९ सालीं शिरगणतीच्या कमिशननें केलेल्या अंदाजा-इतकी लोकसंख्या भरली. कमिशननें २.४४७ कोटी असा अंदाज केला होता.

**ब्रिटनमधील हिंदी विद्यार्थी**—१९५१ सालीं ब्रिटनमध्यें जितके हिंदी विद्यार्थी आहेत तितके पूर्वी कधींहि नव्हते. उलट-पक्षी, भारतांतील ब्रिटिश नागरिकांची संख्याहि ब्रिटिश राजवटीपेक्षां सर्वांत अधिक आहे. ब्रिटनमध्यें सध्यां २८०० हिंदी विद्यार्थी आहेत. त्यापैकीं ३५० वैद्यकीय व्यवसायाचें शिक्षण घेत आहेत; ८०० जण एंजिनिअरिंग आणि इतर तांत्रिक शिक्षण घेत आहेत. ३५० विद्यार्थी कारखान्यांतून काम करीत आहेत. २५० स्त्रियाहि ब्रिटनमध्यें शिकत आहेत. त्यापैकीं ५० नर्सिंगचें शिक्षण घेत आहेत.

## व्यापार-विषयक बातम्या

**इराक व भारत ह्यांचा व्यापार**—इराक व भारत ह्यांच्या दरम्यान १९५० च्या जानेवारी ते जुलैपर्यंत जो व्यापार झाला त्यांत भारताला अनुकूल अशी तफावत आहे. ह्या कालांत भारतानें आयातीपेक्षां २,७०,००,००० रु. किंमतीची अधिक निर्यात केली. ह्यांच्या मागील वर्षी भारताची आयात निर्यातीपेक्षां २,५२,००,००० रु. नीं अधिक झाली होती.

**अमेरिकेचें स्टोव्हचें उत्पादन**—१९४९ सालीं अमेरिकेंत २३,७८,८०० स्टोव्हज् अगर चुले उत्पादन करण्यांत आले. त्यापैकीं ९,०४,००० स्टोव्हज् व चुले विजेवर चालणारे होते आणि २४,७५,००० कोळसा अगर तल हें जळण वापरणारे होते.

**व्हाइटवे कंपनीचें दुकान बंद**—कलकत्त्यामधील व्हाइटवे लेडलॉ कंपनीनें आपलें दुकान नुकतेंच बंद केलें. ह्या कंपनीची स्थापना कलकत्त्यांत १८८२ सालीं झाली होती. कंपनीची सध्याची इमारत १९०८ सालीं बांधण्यास सुरवात झाली व १९११ सालीं ती पूर्ण झाली. कंपनीची 'शो रूम्' पूर्वेकडील देशांत सर्वांत मोठी होती. कंपनीच्या इमारतीवर एक मोठें घड्याळ बसविलेलें आहे. त्याचा व्यास ८ फूट व परिघ २५ फूट आहे.

**तांदुळाची देणगी नाकारली**—व्हिएटनाम सरकारनें भारताला देऊं केलेली १०० टन तांदुळाची देणगी भारताच्या सरकारनें नाकारली आहे असें समजतें. भारतीय सरकारनें व्हिएटनाम सरकारला मान्यता दिलेली नाहीं म्हणून वरील देणगी नाकारण्यांत आली. तथापि किंमत आणि दर्जा पटल्यास त्या सरकारकडून ३०,००० टन तांदुळ विकत घेण्याची सरकारची तयारी आहे असें म्हणतात.

**खेकड्यांच्या मांसाच्या आयातीला बंदी**—रशिआंतून आयात होणाऱ्या डबाबंद खेकड्याच्या मांसाला अमेरिकेनें बंदी केली आहे. १९४३ सालीं रशियाला राजकीय मान्यता दिल्यानंतर अशा प्रकारची बंदी घालण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. डबाबंद मांसाच्या धंद्यांत जे मजूर काम करतात त्यांच्याकडून गुलामाप्रमाणें कामें करून घेण्यांत येतात, असें अमेरिकेचें म्हणणें आहे.

**भारताचें मँगेनीझचें उत्पादन**—मँगेनीझ हा धातू निर्यात करून भारताला डॉलर्स मिळवितां येतात. ह्या धातूच्या खाणी मध्यप्रांतांत आहेत. खाणीचें उत्पादन शास्त्रशुद्ध पायावर उभारण्यासाठीं आणि मँगेनीझचें उत्पादन वाढविण्यासाठीं भारतीय सरकारनें दोन तज्ज्ञ अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे.

**भारत-पोलंड व्यापारी करार**—भारत आणि पोलंड ह्यांच्या दरम्यान एक व्यापारी करार नुकताच करण्यांत आला आहे. पोलंडकडून भारत सायकली, एनॅमेलच्या वस्तू, नळ, रसायनें, इत्यादि माल घेणार आहे. पोलंड भारताकडून लोखंडाची माती, चहा, कच्चीं कातडीं, वनस्पतींचीं तेलें इत्यादि माल घेणार आहे. करार १९५१ सालापुरताच आहे.

**सिंगापूरला कापडाची निर्यात**—भारतांतून सिंगापूरला कापडाची निर्यात लवकरच मोठ्या प्रमाणावर करण्यांत येणार आहे असें समजतें. कापडाच्या जागतिक बाजारपेठेंत भारत जितकें कापड निर्यात करणार आहे, त्यापैकीं ४० टक्के कापड सिंगापूरला निर्यात करण्यांत येईल.


व्यापारी व कारखानदार

यांचे प्रश्न सोडविण्यास मदत करूं व सल्ला देऊं.

— ३० वर्षांचे अनुभवी. —

कंपनी कायदा व मॅनेजमेंट, रेकार्डस्, ऑफिस मॅनेजमेन्ट व आर्गनायझेशन कॉस्टिंग्ज, व्यापारी व ऑफीस चार्टस्, वगैरे कामें माफक फी घेऊन करून देऊं. लिहा:—

जी. के. ॲण्ड सन्स,
विद्यामंदिर, मुंबई २४.

फोन: ३४५११ तार: SAHYOG

दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करते:—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करते:—

हातमागावरील कापड ( सुती व लोकरी ), धातूचें सामान, चंदनी लाकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.



## भारतांतील बँकिंग

### ( ३१ डिसेंबर, १९४९ रोजींचे आंकडे )

भारतांतील फक्त दोन राज्यांत, म्हणजे मुंबई व प. बंगाल ह्या राज्यांत, बँकिंगचा विशेष प्रसार झालेला आहे; सुमारें ५०% बँकिंग तेथेंच चालतें. मद्रास, उ. प्रदेश आणि दिल्ली ह्यांचा अनुक्रम मागाहून लागतो. खालील तक्त्यावरून दिसून येईल, कीं एकूण ८४२ कोटींच्या ठेवीपैकीं मुंबई व प. बंगाल ह्यांत ४५२ कोटींच्या ठेवी आहेत, आणि उ. प्रदेश, मद्रास व दिल्ली येथें १८५ कोटींच्या ठेवी आहेत. बाकी सर्व भारतांत मिळून उरलेल्या २०४ कोटींच्या ठेवी आहेत. बँकांनीं दिलेल्या कर्जापैकीं मुंबई व प. बंगाल येथें ६२ % कर्जें दिलेलीं आहेत; मद्रासमध्यें ११% व उ. प्रदेशांत ७% आहेत. म्हणजे, भारतांतील बँकांनीं दिलेल्या एकूण कर्जापैकीं ८०% कर्जें ह्या चार राज्यांतूनच वाटलेलीं आहेत.

| सबंध भारत | एकूण बँक कचेऱ्या २,७८८ | ठेवी (कोटी रु. चे ८४२ | कर्जें आकडे) ४२५ |
|---|---|---|---|
| मुंबई | ४३२ | २७४ | १३१ |
| प. बंगाल | २१२ | १७९ | १३१ |
| उ. प्रदेश | ४२९ | ६८ | ३१ |
| मद्रास | ५३४ | ६२ | ४६ |
| दिल्ली | ८५ | ५५ | १५ |

एकूण कचेऱ्यांच्या संख्येशीं ठेवींची व कर्जांची तुलना केली, तर उ. प्रदेश व मद्रास येथें ठेवी व कर्जें ह्या मानानें बँक कचेऱ्यांची संख्या फारच मोठी आढळते.

भारताच्या बँकिंगचे क्षेत्रांत शेड्यूल्ड बँकांचें वर्चस्व फारच मोठें आहे. सर्व बँकांच्या शेअर भांडवलांत त्यांचा हिस्सा ८५% असून एकूण ठेवींपैकीं ९५% ठेवी त्यांचेकडे आहेत. दिलेल्या कर्जापैकीं ९३% कर्जांचे घेणेकरी ते असून रोख्यांतील गुंतवणुकी-पैकीं ९३% गुंतवणूक त्यांची आहे. एक्सचेंज बँका, इतर शेड्यूल्ड बँका व बिगर शेड्यूल्ड बँका ह्यांचेकडील ठेवींची वर्गवारी खालीं दिली आहे.

| बँका | ठेवी ( कोटी रु. ) | एकूण ठेवींशीं प्रमाण % |
|---|---|---|
| एक्सचेंज बँका | ११५ | १८ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ६४९ | ७७ |
| बिगर शेड्यूल्ड बँका | ४० | ५ |
| एकूण | ८०४ | १०० |

दिलेल्या कर्जांची छाननी खालीलप्रमाणें होते.

| | | |
|---|---|---|
| शेड्यूल्ड बँका | ३७२ कोटी रु. | ९३% |
| पैकीं एक्सचेंज बँका | १०० " | २५% |
| बिगर शेड्यूल्ड बँका | ३० " | ७% |

### स्वित्सलँडमधील घड्याळांचा धंदा

स्वित्सरलंडमध्यें २,५००. कारखान्यांत मिळून ४८,००० कामगार घड्याळें बनविण्याचें काम करतात. त्यांनीं तयार केलेल्या घड्याळांपैकीं ९५% घड्याळें बाहेर पाठविलीं जातात. स्वित्सरलंडच्या एकूण निर्गतीपैकीं २०% निर्गत घड्याळांचीच असते. कच्च्या मालाच्या उपयोगाच्या मानानें कामगार अधिक लागणारा हा धंदा आहे.

**चहाच्या निर्यातींत घट**—जानेवारी ६ रोजीं संपलेल्या आठ-वड्यांत कलकत्त्याहून ७,८०,००० पौंड चहा निर्यात करण्यांत आला. १९५० सालच्या चहाच्या हंगामांत कलकत्त्याहून एकूण २८,५३,२०,००० पौण्ड चहा निर्यात झाला. ह्या हंगामांत ब्रिटननें भारताकडून कमी चहा घेतला. मागील सालच्या हंगामांत ब्रिटननें २०,६५,६०,००० पौण्ड चहा घेतला होता. गेल्या हंगामांत १९,३०,९०,००० पौण्ड घेतला. कॅनडाला व अमेरिकेला निर्यात होणाऱ्या चहांतहि घट झाली आहे.

**चहाच्या मळ्यांतील मजुरांचें वेतन**— किमान-वेतन-समितीच्या शिफारसी मान्य करून पंजाब सरकारनें मळ्यावर काम करणाऱ्या मजुरांचें किमान वेतन निश्चित केलें आहे. चहाच्या मळ्यावर काम करणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या मजु-रांचें मासिक वेतन २५ तें ६० रु. पर्यंत ठरविण्यांत आलें आहे. रोजंदारीवर काम करणाऱ्या पुरुषाला ११ आणे, स्त्रीला ८॥ आणे आणि मुलाला ६ आणे वेतन ठरविलें गेलें आहे. हे दर पुढील एप्रिलपासून अमलांत येणार आहेत.

**ब्रिटनमधील बेकायदा जननाची संख्या**—ब्रिटनमध्यें गेल्या तीन महिन्यांत एकूण १,७०,१८० मुलें जन्माला आलीं. त्यांपैकीं ८,१७१ मुलें अविवाहित मातांना झालेलीं होतीं. प्रत्येक वीस मुलांपैकीं एक बेकायदा, असें प्रमाण पडतें. ह्याच तिमाहींत ब्रिटनमधील मुलांची मृत्युसंख्या दर हजारीं २४ अशी पडली. १९४९ सालीं ह्याच कालांतील प्रमाण दर हजारीं २७ असें होतें.

**अमेरिकेंतील किंमती स्थिरावण्याचा परिणाम**—ता. २९ जानेवारी रोजीं अमेरिकन सरकारनें वस्तूंच्या किंमती कायद्यानें स्थिर केल्यामुळें कापूस, साखर, कॉफी, मिरी, लोकर, रबर, टिन, तांबें, कच्चीं कातडीं इ. वस्तूंचा व्यापार तात्पुरता बंद ठेवण्यांत आला होता. कोकोच्या बिया, सोयाबीन व धान्य इतक्याच वस्तूंचा व्यापार चालू होता.

**नियंत्रणाविषयीं प्रश्नपत्रिका**—धान्यावरील नियंत्रणें कशीं काय अंमलांत येत आहेत, हें अजमावण्यासाठीं संयुक्तप्रांत सरकारनें ५६ प्रश्नांची एक प्रश्नपत्रिका तयार केली आहे. प्रश्नांचे ४ भाग पाडण्यांत आले आहेतः—( १ ) धान्यवसुली ( २ ) सांठा व वहातूक ( ३ ) वांटप आणि ( ४ ) इतर. ज्या संस्थांना अगर व्यक्तींना ही प्रश्नपत्रिका धाडण्यांत येईल, त्यांनीं १० फेब्रुआरीपर्यंत उत्तरें पाठवावयाचीं आहेत.

**भारतांत स्वित्झरलंडचे प्रवासी**—स्वित्झरलंडमधील हौशी प्रवाशांची एक टोळी लवकरच भारतांत येणार आहे. अजंठा, वेरूळ, उदयपूर, दिल्ली, बनारस, मथुरा, इत्यादि ठिकाणांना भेटी देण्याचा त्यांचा विचार आहे. भारतीय सरकारतर्फें त्यांना सर्व प्रकारची मदत करण्यांत येणार आहे. मार्च महिन्याच्या प्रारंभीं ३०० अमेरिकन प्रवासीहि भारतांतील प्रेक्षणीय स्थळें पहाण्या-साठीं येणार आहेत.

**ब्रिटनच्या नागरी खात्यांतील स्त्री नोकर**—ब्रिटनच्या निरनिराळ्या नागरी खात्यांत हल्लीं ७०,००,००० स्त्रिया काम करीत आहेत. गेल्या महायुद्धांत ८८,००,००० स्त्रिया ह्या खात्यां-तून काम करीत होत्या. गेल्या दोन वर्षांत ३,००,००० अधिक स्त्रिया काम करूं लागल्या आहेत. नोव्हेंबर १९५० मध्यें ब्रिटन-मध्यें ५५,००० कामगारांना नोकऱ्या मिळाल्या; त्यापैकीं ३७,००० स्त्रिया होत्या. ही वाढ जमेस धरून ब्रिटनमधील काम करणाऱ्या लोकांची संख्या आतां २,३५,५८,००० इतकी झाली आहे.

### गो. स. पारखे औद्योगिक मान-पारितोषिकें

मराठा चेंबरतर्फे प्रतिवर्षी देण्यांत येत असलेल्या वरील पारितोषिकांसाठीं करावयाच्या अर्जाची मुदत ३१ मार्च, १९५१ अखेर आहे. पारितोषिकाची एकूण रक्कम ३०० रु. आहे. पारितोषिकाची रक्कम १६ जून, १९५१ रोजीं गोपाळराव पारखे स्मृतिदिनाच्या दिवशीं रोसीनें देण्यांत येईल. सं. महाराष्ट्रांतील ज्या कारखानदारांनीं नवीन वस्तू तयार करून बाजार पेठेंत यशस्वी रीतीनें खपविल्या आहेत, असे होतकरू कारखानदार पारितोषिकांस पात्र होतील.

---

### मुद्रण प्रकाशः मुद्रण शाई संशोधन अंक

( जानेवारी, १९५१. किंमत १ रु. C/o चित्रशाळा प्रेस, पुणें २. )

मुद्रण प्रकाश हें मराठी मुद्रकांच्या उन्नतीस प्रेरक विचारांचें एकमेव मासिक आहे. पुणें मुद्रक संघातर्फे तें प्रसिद्ध होतें. डिसेंबर, १९५० च्या शेवटच्या आठवड्यांत फर्ग्युसन कॉलेजच्या रसायन विभागांत मुद्रण शाई संशोधन प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें, तें अत्यंत यशस्वी ठरलें. डॉ. ढोळे ह्यांच्या नेतृत्वाखालील शाई संशोधन संस्थेमार्फत तें भरविण्यांत आलें होतें. मुद्रण प्रकाशाच्या प्रस्तुत अंकांत ह्या प्रदर्शनाची सचित्र माहिती एकत्रित देण्यांत आली आहे. उद्घाटक प्रो. मॅकबेन ह्यांचें भाषण, शाई प्रदर्शनांतील फलकांचें भाषांतर, मुद्रण-मसी हा डॉ. ढोळे यांचा लेख, प्रदर्शन विषयक ११ चित्रें, इत्यादि ह्या अंकाची वैशिष्ट्यें आहेत. मुद्रण शाईच्या संशोधन प्रदर्शनाचें मुद्रण प्रकाशानें कौतुक केलें आहे, आणि संशोधक व त्यांचे सहकारी यांना परमेश्वरानें ध्येयवादी दृष्टि द्यावी अशी प्रार्थना केली आहे. महाराष्ट्रीय मुद्रकांनीं त्यांच्या जिव्हाळ्याच्या ह्या संशोधनास व्यापक दृष्टीनें सढळ मदत करून स्वतःच्या धंद्यास पोषक अशा ह्या उपक्रमाचें चीज करावें, म्हणजे सर्वांच्याच उन्नतीचा मार्ग सुकर होईल.

---

### सोविएट रशियांतील राहाणीचें मान

श्री. संपादक यांसी सा. न. वि. वि.

दि. २४ जानेवारीच्या आपल्या अंकांतील वरील मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेला मजकूर वाचला. रशियाच्या शास्त्रज्ञांच्या प्रतिनिधि मंडळानें रशियांतील जनतेचें रहाणीचें मान दर वर्षी उंचावत चाललें आहे, असें सांगितल्याचें दिसतें. " रशियन जनतेचें राहाणीचें मान उंचावत आहे असें जेव्हां सांगण्यांत येतें, तेव्हां अमेरिके-सारख्या देशांशीं तुलना अभिप्रेत नसून रशियाच्याच पूर्वीच्या रहाणीच्या मानाशीं तुलना करावयाची असते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. रशियन अर्थव्यवस्थेचें वैशिष्ट्य लक्षांत घेतां रहाणीचें मान उंचावत जाणें केवळ अशक्यच आहे असें म्हणतां येत नाहीं. " असें " अर्थां "तील लेखाचे शेवटीं म्हटलें आहे.

उलट, प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं 'आर्थिक नियोजनाची पूर्वतयारी' या विषयावर बोलतांना असें म्हटलेलें दिसतें कीं, " १९१८ पासून १९३८ पर्यंतच्या वीस वर्षांत रशियांतील जनतेच्या राहाणीचें मान वाढलें नाहीं. उलट, १९१८ ते १९२८ या पहिल्या दहा वर्षांत तें खालींच घसरलें; १९२८ पासून पुढच्या दहा वर्षांत तें पहिल्या महायुद्धापूर्वी १९१४ सालीं असलेल्या पातळीस येऊन पोहोचलें ! "

—विवेक परदेशी

---


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.



( स्थापना १९१८ )

बचतीच्या विविध योजना

हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

शाखा : दादर, माहीम, बेळगांव


### भारताची परकीय हुंडणावळ व आयात

ब्रिटिश कॉमनवेल्थमधील राष्ट्रांची डॉलर्ससंबंधीं काय परिस्थिति आहे, आणि १९५१ सालीं ही परिस्थिति काय असूं शकेल, ह्या संबंधीं अंदाज देणारी माहिती ब्रिटिश सरकारनें भारत सरकारला पाठविली असल्याची बातमी आहे. १९५० सालीं ब्रिटनचा डॉलरचा साठा बराच वाढला असला तरी ब्रिटनकडे येणें असणाऱ्या राष्ट्रांनीं डॉलरच्या हुंडणावळीबाबत कडक काटकसर करणें जरूर असल्याचें ब्रिटिश सरकारनें सुचविल्याचें समजतें. ब्रिटननें मार्शल मदत घेण्याचें बंद करण्याचें ठरविल्यामुळें आणि स्वतःचें उत्पादन संरक्षणासाठी अधिक करण्याचें ठरविल्यामुळें निर्यात करून डॉलर्स मिळविण्याचें ब्रिटनचें सामर्थ्य कमी झालें आहे. भारतानें ज्या मालाला डॉलर्स द्यावे लागतात अशा मालांची आयात कमीत कमी करून सेंट्रल डॉलर रिझर्व्हमध्यें बरीच भर घातलेली आहे. त्याच बरोबर, भारतानें निर्यात वाढवून आयातीवरहि बंधनें घातलीं आहेत. त्यामुळें भारताच्या पौण्डी गंगाजळींत वाढ झालेली आहे. डिसेंबर १९५० च्या असेर ही गंगाजळी ६२.६५ कोटी पौण्ड होती. येत्या सहा महिन्यांत भारताला ह्या गंगाजळीचा आणि आपल्या खातीं असलेल्या डॉलर्सचा अधिक उपयोग करावा लागेल अशीं लक्षणें दिसत आहेत; कारण, देशांत अन्नधान्य, कापूस आणि कांहीं औद्योगिक कच्चा माल ह्यांचा तुटवडा पडला आहे. भारतांतील उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल आयात करण्यासाठीं भारत सरकार आयातीला अधिक वाव देणार आहे अशी वार्ता आहे. १९५१ सालीं मागील सालाइतकी तरी निर्यात भारत करूं शकेल असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे. पौंडी गटाच्या कक्षेंतून भारताला लागणारा आवश्यक माल मिळूं शकला तर फारशी पंचाईत पडण्याचें कारण नाहीं. परंतु आज अशी परिस्थिति आहे कीं वृत्तपत्रीय कागद, लोखंडाचा अंश नसणारे खनिज धातू इत्यादि माल पौंडी गटाच्या राष्ट्रांत मिळूं शकत नाहीं.

---

**म. गांधींच्या चरित्राचा खप**—लुई फिशर ह्या अमेरिकन ग्रंथकारानें लिहिलेलें महात्माजींचें चरित्र लंडन येथें नुकतें च प्रसिद्ध करण्यांत आलें. पाश्चिमात्य लेखकानें लिहिलेलें असें हें पहिलेंच विस्तृत गांधी-चरित्र आहे. पुस्तकाची किंमत २५ शिलिंग असूनसुद्धां त्याला बरीच मोठी मागणी येत आहे.

**शोध आणि त्यांचा उपयोग**—ब्रिटनच्या नॅशनल रिसर्च डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननें आपला पहिल्या वर्षाचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. विद्यापीठांतर्फे आलेल्या २० औद्योगिक शोधांपैकीं १६ शोधांचा उपयोग करण्यांत येत आहे; फक्त २ शोध नाकारले गेले. मेडिकल रिसर्च कौन्सिलतर्फे १२ शोध आले होते; त्यांपैकीं ७ शोधांचा उपयोग करण्यांत येत आहे. खाजगी संशोधकांनीं ४८५ शोध संस्थेकडे पाठविले. त्यांपैकीं ३५८ नाकारण्यांत आले, कांहींचा विचार चालू आहे आणि फक्त ३ शोध वापरण्यांत येत आहेत.

## तांदुळाचा जागतिक पुरवठा

संयुक्त-राष्ट्रसंघटनेच्या अन्न आणि शेती संघटनेतर्फें जगांतील तांदुळाच्या पुरवठ्यासंबंधीं एक अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अतिपूर्वेकडील देशांतील लोकांचें तांदूळ हें प्रमुख अन्न असल्यानें ह्या अहवालाला विशेष महत्त्व आहे. १९५० सालीं तांदुळाचा जो पुरवठा झाला तो युद्धापूर्वीच्या वर्षाच्या सरासरी पुरवठ्यापेक्षां ३ टक्क्यांनीं कमी होता असें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. उलटपक्षीं, लोकसंख्या मात्र १० टक्क्यांनीं वाढली आहे. तेव्हां तांदूळ खाणाऱ्या लोकांना पुरेसा तांदूळ मिळणार नाहीं हें ओघानेंच येतें. तांदुळाच्या उत्पादनासाठीं शेतीच्या आधुनिक तंत्राचा उपयोग करणें कसें जरूर आहे त्याचें दिग्दर्शनहि अहवालांत करण्यांत आलें आहे. भारत, पाकिस्तान आणि ब्रह्मदेश ह्या देशांतील तांदुळाचें दर एकरीं उत्पादन जपानमधील दर एकरीं उत्पादनाच्या मानानें फक्त एक तृतियांश आहे. राजकीय आणि आर्थिक अस्थैर्यामुळें ह्या देशांतील तांदुळाच्या उत्पादनाची वाढ करण्यांत अडथळे उत्पन्न झाले आहेत. तांदुळाची लागवड अधिक जमिनींत करणें आणि एकरीं उत्पादन वाढविणें, असे उत्पादनवाढीचे दोन मार्ग आहेत. गेल्या दहा वर्षांत भारतांतील भातशेतीच्या लागवडींत वाढ झालेली दिसून येते. पाण्याच्या निश्चित पुरवठ्याचा अभाव, निकस जमीन, इत्यादि कारणांमुळें भारत व पाकिस्तान ह्या देशांमधील तांदुळाचें उत्पादन किमान पातळीवर आहे. हें उत्पादन कसें वाढवावें हाच प्रश्न मुख्यतः दोन्ही देशांपुढें आहे.

जगांत भाताच्या लागवडीखालीं जितकी जमीन आहे, तिच्या जवळजवळ एक तृतियांश लागवड भारतांत होते. परंतु प्रत्यक्ष उत्पादन मात्र जगांतील तांदुळाच्या उत्पादनाच्या सुमारें एक चतुर्थांशच होतें. पाकिस्तानांतील तांदुळाचें उत्पादन १९४८–४९ च्या मानानें, १९५० सालीं ३·५ टक्क्यांनीं कमी झालें. जपानमधील भाताच्या लागवडीची जमीन युद्धपूर्व–काळापेक्षां कमी झालेली असून सुद्धां, १९४९–५० सालांत जपानचें तांदुळाचें उत्पादन युद्धपूर्व–काळापेक्षां ६ टक्क्यांनीं वाढलें आहे. फोर्मोसामध्येंही तांदुळाचें उत्पादन खूप वाढलें आहे. ब्रह्मदेश हा देश सामान्यतः तांदुळाचें उत्पादन निर्यात करण्याइतकें करतो; परंतु राजकीय अस्थैर्याचा परिणाम होऊन तेथील तांदुळाचें उत्पादन घटलें आहे. चीनमधील भाताचें बरेंच पीक बुडालें आणि ब्रह्मदेशांतीलहि घटलें आहे. ह्यामुळें इतर देशांतून तांदुळाच्या उत्पादनांत जी वाढ झाली तिचा फारसा परिणाम दिसून आला नाहीं. इजिप्त व इटलीमधील भाताच्या शेतीच्या लागवडींत अनुक्रमें १२ व ८ टक्के घट झाल्याचें दिसून येते. ह्या घटीला कारणें मात्र वेगळीं आहेत. जगाच्या बाजारपेठेंत ह्या देशाच्या तांदुळाला त्याच्या अपेक्षेप्रमाणें भाव मिळाला नाहीं, म्हणून आणि परकीय हुंडणावळ मिळण्यांतील अडचणी, ह्या कारणामुळें भाताच्या शेतीच्या लागवडींत कपात करण्यांत आली. ब्राझिल हा देश जगांतील कोणत्याहि देशापेक्षा अधिक तांदूळ पिकवितो. १९४८–४९ सालापेक्षा, १९४९–५० सालीं ब्राझिलमधील तांदुळाचें उत्पादन १३ टक्क्यांनीं वाढलें आहे. अमेरिकेच्या उत्पादनांत युद्धपूर्व काळापेक्षां ९० टक्के वाढ झाली आहे. १९५० सालीं भारतानें तांदुळाच्या आयातींत मोठी कपात केली, चीननें आयात जवळजवळ थांबविलीच आणि जपाननें अतिपूर्वेकडील बाजारांत सर्व राष्ट्रांपेक्षां अधिक तांदूळ खरेदी करण्यास सुरवात केली.

## सहकारी सोसायटीच्या मॅनेजिंग कमिटीचें सभासदत्व

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

सारस्वत सबर्बन को. हौसिंग सोसायटी लि. च्या मॅनेजिंग कमिटीचे श्री. एस. एस. मुर्डेश्वर इ. गृहस्थ सभासद होते. त्यांना मुंबई राज्य सरकारनें मॅनेजिंग कमिटीवरून काढून टाकणारा, नवी मॅनेजिंग कमिटी नेमणारा, हुकूम केला होता तो रद्द करून मागणारा अर्ज श्री. मुर्डेश्वर प्रभृतींनीं मुंबई हायकोर्टाकडे केला. " संपूर्ण भरणा झालेला शेअर जो धारण करीत नाहीं अशास कमिटीचें सभासदत्व प्राप्त होऊं शकणार नाहीं, असा सोसायटीचा एक कानू आहे. प्रस्तुत प्रकरणीं सरकारनें कमिटीवर ज्यांची नेमणूक केली, ते ही लायकीची अट पुरी पाडत नसल्याकारणानें, अशी नेमणूक सरकारच्या अधिकाराबाहेरचीच आहे. परंतु, सभासदांना काढून टाकणारा हुकूम मात्र बेकायदा नाहीं. म्हणून सरकारी हुकुमापैकीं भाग धारणेची लायकी नसलेल्यांची नेमणूक करणारा भाग आम्हीं बेकायदा ठरवितो. " असा मुंबई हायकोर्टानें ( न्या. तेंडोलकर ) निवाडा केला. म्हणजे, मूळ मॅनेजिंग कमिटी रद्द झाली परंतु नवीन नेमलेली मॅनेजिंग कमिटीहि बेकायदा ठरली.

---

**जत सहकारी सेक्रेटरी शिक्षण–वर्गाच्या परीक्षेचा निकाल.**

दक्षिण सातारा जिल्हा को. बोर्डाच्या विद्यमानें माहे आगष्ट ते आक्टोबर १९५० च्या अखेरीस झालेल्या "सहकारी सेक्रेटरी शिक्षणवर्गा"च्या परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणें जाहीर करण्यांत आला आहे. परीक्षेस एकूण ३० विद्यार्थी बसले होते. त्यांपैकीं पहिल्या वर्गांत २, दुसऱ्या वर्गांत ८, तिसऱ्या वर्गांत १० असे एकूण २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें शेंकडा प्रमाण ६६⅔ आहे.

वर्ग १ ला. ( गुणानुक्रमें ) १ बा. ल. तांबोळी, २ कें. मा. सरगर.

वर्ग २ रा. १ ना. भा. भोसले, २ वि. पां. देशपांडे, ३. कु. भी. पाटील, ४ ब. द. चोपडे, ५ वि. गो. पाठक, ६ आ. ज्ञा. पवार, ७ म. हे. नंदूर, ८ मा. म. चव्हाण.

वर्ग ३ रा. १ ग. चि. शिंदे, २ व. सिताराम चव्हाण, ३ जा. हु. इमाम पाटील, ४ वि. गि. भद्रे, ५ यशवंत भा. पवार, ६ भि. स. बिरादार, ७ म. शि. बिरादार, ८ सो. मा. भंडे, ९ चं. बा. सावळे, १० रा. गो. लकडे.

डी. बी. निकम,
को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर, जि. द. सातारा, सांगली.

रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ताः—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा ७. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.